स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। रविवार ।
दि. 12 एप्रिल 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशीकडे 'चुकीला माफी नाही'; सहाय्यक आयुक्तांना नोटीस

# गोपनीय माहिती ‘लीक’ करणाऱ्या दोन अधिकाऱ्यांचे निलंबन

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**शहरातील वाढत्या अनधिकृत बांधकामांच्या पार्श्वभूमीवर अखेर महापालिका प्रशासनाने कठोर भूमिका घेतली असून आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी जबाबदार अधिकाऱ्यांवर थेट कारवाईचा बडगा उगारला आहे. कर्तव्यात कसूर, अनधिकृत बांधकामांकडे दुर्लक्ष आणि सर्वात गंभीर म्हणजे अतिक्रमण कारवाईची गोपनीय माहिती संबंधितांना पुरविण्याच्या प्रकारामुळे प्रशासनात खळबळ उडाली आहे. या प्रकरणात दोन अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्यात आले असून सहायक आयुक्तांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.**




महापालिकेच्या इतिहासात अनधिकृत बांधकामांविरोधातील ही कारवाई एक निर्णायक पाऊल मानली जात असून आयुक्त सूर्यवंशी यांनी ‘शून्य सहनशीलता’ (ZERO TOLERANCE) धोरण स्पष्टपणे राबवण्यास सुरुवात केल्याचे यावरून दिसून येते. महापालिकेच्या ‘ई’ क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत तब्बल ५६२ अनधिकृत बांधकामांना नोटिसा देण्यात आल्या होत्या. मात्र, प्रत्यक्षात केवळ ८२ ठिकाणीच कारवाई करण्यात आली. उर्वरित ४८० बांधकामांवर कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. याच पार्श्वभूमीवर सहायक आयुक्त तानाजी नरळे यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी असूनही त्यांनी दुर्लक्ष केल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले आहे. दर महिन्याला होणाऱ्या आढावा बैठकीतही त्यांनी अपेक्षित माहिती सादर केली नाही. ही बाब गंभीर मानत आयुक्तांनी तीन दिवसांत लेखी खुलासा सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

पिंपरी-चिंचवड शहर झपाट्याने विकसित होत असताना अनधिकृत बांधकामांचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. नियमांचे उल्लंघन करून उभारली जाणारी बांधकामे ही केवळ कायद्याचे उल्लंघन नसून शहराच्या भविष्यासाठी धोका ठरत आहेत. या पार्श्वभूमीवर आयुक्तांनी घेतलेली ही धडक कारवाई शहर नियोजनासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. प्रशासनातील जबाबदार अधिकाऱ्यांनाच जबाबदार धरले जात असल्याने भविष्यात अशा प्रकारांना आळा बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या कारवाईनंतर नागरिकांमध्ये समाधानाची भावना व्यक्त होत आहे. अनेकदा तक्रारी करूनही कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी होती. मात्र, आता आयुक्तांनी थेट कारवाई केल्यामुळे प्रशासनावरील विश्वास वाढला आहे. दुसरीकडे, महापालिकेच्या विविध विभागांमध्ये मात्र खळबळ उडाली असून अधिकारी आणि कर्मचारी अधिक सतर्क झाले आहेत. त्यामुळे अशा प्रकारांवर कठोर कारवाई करणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले आहे.

### गोपनीय माहिती लीक : घटना 1

या संपूर्ण प्रकरणातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे कारवाईपूर्वीच संबंधितांना माहिती मिळाल्यामुळे अतिक्रमण हटविण्याच्या मोहिमेत अडथळा निर्माण झाला. कनिष्ठ अभियंता संदीप हजारे यांच्यावर गंभीर आरोप ठेवण्यात आले आहेत. ‘ह’ क्षेत्रीय कार्यालयातील अनधिकृत बांधकामांवर १ एप्रिल रोजी मोठ्या प्रमाणावर कारवाईचे नियोजन करण्यात आले होते. पोलीस बंदोबस्तासह सर्व तयारी पूर्ण असताना, कारवाईच्या आदल्या दिवशी म्हणजे ३१ मार्च रोजीच गोपनीय माहिती संबंधितांपर्यंत पोहोचली. परिणामी, संबंधितांनी आधीच तयारी करून कारवाईला विरोध केला, दबाव निर्माण केला आणि संपूर्ण मोहिमेवर परिणाम झाला. या प्रकारामुळे प्रशासनाची प्रतिमा धुळीस मिळाली. या गंभीर गैरप्रकाराची दखल घेत आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी हजारे यांना तात्काळ निलंबित केले असून विभागीय चौकशी सुरू केली आहे.

### ‘शिस्तभंगाला थारा नाही’ – आयुक्तांचा स्पष्ट इशारा

या संपूर्ण कारवाईतून आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी प्रशासनातील अधिकाऱ्यांना स्पष्ट संदेश दिला आहे की, कर्तव्यातील हलगर्जीपणा, भ्रष्टाचार किंवा गैरव्यवहार अजिबात सहन केला जाणार नाही. अनधिकृत बांधकामांमुळे शहराच्या नियोजनावर परिणाम होत असून नागरिकांच्या सुरक्षेलाही धोका निर्माण होतो. त्यामुळे अशा प्रकारांवर कठोर कारवाई करणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले आहे.

### गोपनीय माहिती लीक : घटना 2

दुसरे निलंबित अधिकारी म्हणजे स्थापत्य अभियांत्रिकी सहायक शेषेराव अटकोरे. ‘ड’ क्षेत्रीय कार्यालयातील पिंपळेगुरव परिसरातील अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. मात्र, त्यांनी ना सर्वेक्षण केले, ना अहवाल सादर केला, ना कोणालाही नोटिसा दिल्या. परिणामी, त्या परिसरात अनधिकृत बांधकामांचा अक्षरशः सुळसुळाट झाला. नागरिकांच्या तक्रारी वाढत गेल्या, पण प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई झाली नाही. या निष्काळजीपणाला जबाबदार धरत अटकोरे यांनाही निलंबित करण्यात आले असून त्यांच्यावर विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.

### ‘स्वच्छ आणि शिस्तबद्ध प्रशासन’ची दिशा

एकूणच, अनधिकृत बांधकामांविरोधातील ही कारवाई केवळ शिस्तभंगाची कारवाई नसून ‘स्वच्छ आणि पारदर्शक प्रशासन’ उभारण्याच्या दिशेने उचललेले ठोस पाऊल आहे.

# अखेर लेखाधिकारी प्रवीण जैन सक्तीच्या रजेवर

## अभिषेक बारणे यांच्या पाठपुराव्याला यश; आयुक्त विजय सूर्यवंशी यांचे आदेश

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेमध्ये तब्बल ५२ कोटी रुपयांच्या आर्थिक अनियमिततेच्या संशयित प्रकरणामुळे प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे. या गंभीर प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांना तात्काळ प्रभावाने सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले आहे. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी यासंदर्भात अधिकृत आदेश जारी करत या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी स्वतंत्र समिती नेमण्याचा निर्णय घेतला आहे.**



महापालिका प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, सन २०२५-२६ आणि २०२६-२७ या आर्थिक वर्षांच्या अंदाजपत्रकातील तरतुदींमध्ये बदल करून काही बिलांची अदायगी करण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. या प्रक्रियेत नियमांचे उल्लंघन झाले का, निधीचा चुकीचा वापर झाला का, तसेच आर्थिक व्यवहार पारदर्शक पद्धतीने झाले का, याचा सखोल तपास करण्याचे आदेश आयुक्तांनी दिले आहेत. यासोबतच मागील तीन वर्षांतील अशाच प्रकारच्या आर्थिक व्यवहारांचीही छाननी केली जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी जारी केलेल्या आदेशात नमूद केले आहे की, चौकशी प्रक्रिया पूर्णपणे निष्पक्ष, पारदर्शक आणि कोणत्याही प्रकारच्या दबावाशिवाय पार पाडली जावी, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्या आहेत. चौकशीदरम्यान कोणताही हस्तक्षेप होऊ नये, यासाठीच प्रवीण जैन यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, प्रवीण जैन यांच्या पदाचा अतिरिक्त कार्यभार मुख्य लेखा परीक्षक प्रमोद भोसले यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. प्रशासनाच्या कामकाजात कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. प्रमोद भोसले यांच्याकडून वित्त विभागाचे कामकाज सुरळीतपणे पार पाडले जाईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

या प्रकरणामुळे महापालिकेच्या आर्थिक व्यवहारांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, प्रशासनाच्या पारदर्शकतेबाबत नागरिकांमध्येही चर्चा सुरू झाली आहे. मोठ्या रकमेचा समावेश असलेल्या या प्रकरणामुळे महापालिकेच्या आर्थिक शिस्तीवर आणि अंतर्गत नियंत्रण यंत्रणांवरही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. विशेष म्हणजे, अंदाजपत्रकातील तरतुदींमध्ये बदल करून बिलांची अदायगी करण्यात आल्याचा मुद्दा समोर आल्यामुळे या प्रकरणाची गंभीरता अधिक वाढली आहे.

राजकीय वर्तुळातही या घडामोडींवरून प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. काहींनी या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली असून, दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. तसेच, भविष्यात अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी महापालिकेच्या आर्थिक व्यवहारांमध्ये अधिक कडक नियम आणि नियंत्रण यंत्रणा लागू करण्याची गरजही व्यक्त केली जात आहे. या प्रकरणाच्या चौकशीतून नेमकी काय तथ्ये समोर येतात, कोणत्या पातळीवर अनियमितता झाली आहे आणि त्यासाठी जबाबदार कोण आहेत, हे लवकरच स्पष्ट होण्याची शक्यता आहे. दरम्यान, या प्रकरणामुळे महापालिकेत एकच खळबळ उडाली असून, पुढील घडामोडींकडे नागरिकांसह राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# प्रभागनिहाय रक्तदान शिबिरे आयोजित करा : नगरसेवक डॉ. सुहास कांबळे

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालय येथे सध्या चिंताजनक रक्तटंचाई निर्माण झाली असून, उपलब्ध रक्तसाठा केवळ पुढील १५ ते २० दिवस पुरेल इतकाच उरल्याची चिंताजनक माहिती समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर शहर सुधारणा समितीचे सदस्य डॉ. सुहास कांबळे यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना निवेदन देत, शहरातील सर्व प्रभागांमध्ये प्रभागनिहाय रक्तदान शिबिरे आयोजित करण्याची मागणी केली आहे, ज्यावर आयुक्त डॉ. परदेशी यांनी सकारात्मक भूमिका व्यक्त केली.**



> “आमदार महेशदादा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली काम करत असताना नागरिकांना आरोग्याविषयक सुविधा तातडीने उपलब्ध व्हाव्यात याची गांभीर्याने दखल घेतली जाते. सध्या जाणवत असलेला रक्ताचा तुटवडा हा गंभीर विषय आहे. याबाबत आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना निवेदन देऊन विविध मागण्या केल्या आहेत.. त्यावर उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करणार असल्याचे आयुक्त महोदयांनी आश्वासित केले आहे. प्रभागनिहाय रक्तदान शिबीरे व जनजागृतीने हा प्रश्न सुटेल असा विश्वास आहे.
>
> – **डॉ. सुहास कांबळे,** नगरसेवक, सदस्य, शहर सुधारणा समिती.

नगरसेवक डॉ. सुहास कांबळे यांनी दिलेल्या पत्रात नमूद केले आहे की, वायसीएम रुग्णालयामध्ये दररोज सरासरी ६० ते ८० रक्तपिशव्यांची आवश्यकता भासते. मात्र सध्या उपलब्ध असलेला रक्तसाठा अपुरा पडत असल्याने आपत्कालीन उपचार, शस्त्रक्रिया तसेच गंभीर रुग्णांच्या उपचारांवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे ही परिस्थिती अत्यंत गंभीर असून तातडीच्या उपाययोजनांची आवश्यकता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

रक्तसंकलन वाढविण्यासाठी महापालिका प्रशासनाने अधिक नियोजनबद्ध व व्यापक स्तरावर कार्यवाही करावी, अशी भूमिका मांडताना डॉ. कांबळे यांनी चार महत्त्वाच्या उपाययोजना सुचवल्या आहेत. त्यामध्ये प्रत्येक प्रभागात नियोजित वेळापत्रकानुसार नियमित रक्तदान शिबिरे आयोजित करणे, त्यासाठी स्थानिक नगरसेवक, सामाजिक संस्था व स्वयंसेवी संघटनांचा सहभाग घेणे, अशी मागणी करण्यात आली आहे.

यासोबतच रक्तदानाचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचावे यासाठी व्यापक जनजागृती मोहीम राबविण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली आहे. सोशल मीडिया, स्थानिक वृत्तपत्रे, होर्डिंग्ज तसेच शाळा व महाविद्यालयांमधून प्रचार केल्यास नागरिकांचा प्रतिसाद वाढू शकतो, असे मत त्यांनी व्यक्त केले आहे.

स्थानिक पातळीवर नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी गृहनिर्माण सोसायट्या, युवक मंडळे व महिला मंडळांना प्रोत्साहन देण्याचीही मागणी करण्यात आली आहे. तसेच पिंपरी-चिंचवड हे औद्योगिक शहर असल्याने विविध औद्योगिक आस्थापनांमध्ये विशेष रक्तदान शिबिरे आयोजित करण्यासाठी महापालिका प्रशासनाने पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.

# पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या ताफ्यात ५० नवीन वाहने

## पोलिसांच्या आपत्कालीन प्रतिसाद क्षमतेत वाढ होऊन नागरिकांना अधिक जलद सेवा मिळणार

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**शहरातील कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या ताफ्यात नव्याने ८ चारचाकी आणि ४२ दुचाकी वाहनांचा समावेश करण्यात आला आहे. या नव्या वाहनांमुळे पोलिसांची आपत्कालीन प्रतिसाद क्षमता लक्षणीयरीत्या वाढणार असून, नागरिकांना अधिक जलद, परिणामकारक आणि वेळेवर सेवा मिळण्यास मोठी मदत होणार आहे.**





शहराचा झपाट्याने वाढणारा विस्तार, वाढती लोकसंख्या आणि गुन्हेगारीचे बदलते स्वरूप लक्षात घेता पोलिस यंत्रणेचे आधुनिकीकरण अत्यावश्यक बनले आहे. या पार्श्वभूमीवर पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या नेतृत्वाखाली पोलिस दलाला अधिक सक्षम, सुसज्ज आणि तत्पर बनविण्याचा सातत्यपूर्ण प्रयत्न सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून ही नवीन वाहने ताफ्यात दाखल करण्यात आली आहेत.

पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी कार्यभार स्वीकारला तेव्हा पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाकडे एकूण ३१९ वाहने उपलब्ध होती. त्यामध्ये १८० मोटारसायकली, १२ कार, १०९ जीप, १२ लाईट व्हॅन आणि ६ बस यांचा समावेश होता. मात्र, शहराच्या वाढत्या कामकाजाच्या तुलनेत ही संख्या अपुरी ठरत होती. गुन्हेगारी नियंत्रण, गस्त, आपत्कालीन परिस्थितीत तातडीने प्रतिसाद देणे आणि नागरिकांना वेळेवर मदत पोहोचवणे यासाठी अधिक वाहनांची आवश्यकता जाणवत होती.

ही गरज ओळखून आयुक्त चौबे यांनी पोलिस महासंचालक कार्यालय तसेच जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्ताव सादर करून सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळत त्यांच्या कार्यकाळात एकूण ३६७ नवीन वाहने पोलिस आयुक्तालयाला उपलब्ध झाली आहेत. या वाहनांमुळे पोलिस दलाची कार्यक्षमता मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

जिल्हा नियोजन समितीकडून प्राप्त झालेल्या वाहनांमध्ये १०२ मोटारसायकली, १५७ जीप, ३ लाईट व्हॅन आणि १ ट्रक यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, यापैकी २५ मोटारसायकली या बजाज कंपनीच्या वतीने पुरस्कृत करण्यात आल्या आहेत. यामुळे पोलिसांना अधिक सक्षम साधने उपलब्ध झाली आहेत. तसेच पोलिस महासंचालक कार्यालयाकडून ७१ मोटारसायकली, २ कार, १ जीप, १६ लाईट व्हॅन, १३ बस आणि १ टँकर अशी एकूण १०४ वाहने प्राप्त झाली आहेत. नव्याने समाविष्ट झालेल्या ८ चारचाकी आणि ४२ दुचाकी वाहनांमुळे शहरातील विविध भागांमध्ये गस्त वाढविणे, गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण ठेवणे आणि आपत्कालीन परिस्थितींना जलद प्रतिसाद देणे अधिक सुलभ होणार आहे. विशेषतः वाहतूक कोंडी, अपघात, नैसर्गिक आपत्ती किंवा गुन्हेगारी घटनांमध्ये पोलिसांची तत्परता वाढून नागरिकांना त्वरित मदत मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या वाहनांमुळे पोलिस दलाची पोहोच शहराच्या दुर्गम भागांपर्यंत अधिक वेगाने होणार आहे. तसेच महिला सुरक्षा, रात्रीची गस्त, वाहतूक नियंत्रण आणि गुन्हे तपास या सर्व क्षेत्रांमध्ये सुधारणा होण्यास मदत होणार आहे. पोलिस दलाला आधुनिक साधनसामग्री उपलब्ध करून देण्याचा हा उपक्रम भविष्यातही सुरू ठेवला जाईल, असे संकेत प्रशासनाकडून देण्यात आले आहेत. पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी यावेळी सांगितले की, “नवीन वाहनांच्या समावेशामुळे पोलिस दलाची कार्यक्षमता वाढणार असून, नागरिकांना अधिक जलद आणि प्रभावी सेवा देता येईल. शहरातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम ठेवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.” एकंदरीत, पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या ताफ्यातील या वाढीमुळे पोलिस दल अधिक सक्षम, गतिमान आणि नागरिकाभिमुख होणार असून, शहरातील सुरक्षाव्यवस्था अधिक बळकट होण्यास निश्चितच हातभार लागणार आहे.

# महापालिकेत मराठीला बळकटी; एम.ए. कर्मचाऱ्यांना दोन वेतनवाढींचा प्रस्ताव

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत मराठी भाषेच्या व्यापक वापरासाठी महत्त्वपूर्ण निर्णयप्रक्रिया सुरू असून, यासंदर्भातील प्रस्ताव नगर सचिवांकडे पाठविण्यात आला आहे. महापालिका विधी समिती सभापती सुजाता बोराटे यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, सदर प्रस्तावाला महानगरपालिका मुख्य सभेची मान्यता मिळाल्यानंतरच त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यात येणार आहे.**




महापालिकेच्या प्रशासनात मराठी भाषेचा १०० टक्के वापर व्हावा, तसेच कामकाज अधिक सोपे, सुटसुटीत आणि सर्वसामान्यांना समजणारे व्हावे, या उद्देशाने विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून प्रशासकीय संवर्गातील वर्ग-३ कर्मचाऱ्यांनी एम.ए. (मराठी) ही पदव्युत्तर पदवी प्राप्त केल्यास त्यांना दोन अतिरिक्त वेतनवाढी देण्याचा प्रस्ताव पुढे आणण्यात आला आहे.

सदर योजनेमुळे कर्मचाऱ्यांमध्ये मराठी विषयात उच्च शिक्षण घेण्याची प्रेरणा निर्माण होईल, तसेच प्रशासनातील लेखन, अनुवाद आणि संवाद अधिक प्रभावी होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

याबाबत बोलताना सुजाता बोराटे म्हणाल्या की, “महापालिकेच्या कामकाजात मराठी भाषेचा अधिकाधिक आणि प्रभावी वापर व्हावा, ही आपली प्राथमिकता आहे. कर्मचाऱ्यांनी स्वप्रेरणेने मराठी विषयात उच्च शिक्षण घेतल्यास त्याचा थेट फायदा प्रशासनाच्या गुणवत्तेत आणि पारदर्शकतेत होणार आहे. हा प्रस्ताव केवळ प्रोत्साहनपर नाही, तर मराठी भाषेला प्रशासनाच्या केंद्रस्थानी आणण्याचा एक ठोस प्रयत्न आहे. मुख्य सभेची मान्यता मिळाल्यानंतर ही योजना प्रभावीपणे राबविली जाईल आणि मराठीच्या जतन व संवर्धनासाठी महत्त्वाचे पाऊल ठरेल.”

सामान्य प्रशासन विभागामार्फत या प्रस्तावास शासन मान्यता मिळविण्याची प्रक्रिया पुढे राबविण्यात येणार असून, मान्यता मिळाल्यानंतर योजनेची अंमलबजावणी सुरू होणार आहे, अशी माहिती सुजाता बोराटे यांनी दिली.

> “ मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून आपल्या प्रशासनाची ओळख आहे. महापालिकेच्या कामकाजात मराठीचा अधिक प्रभावी वापर व्हावा, यासाठी हा प्रस्ताव महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. कर्मचाऱ्यांनी उच्च शिक्षण घेतल्यास प्रशासनाची गुणवत्ता निश्चितच उंचावेल. मुख्य सभेची मान्यता मिळाल्यानंतर ही योजना तत्काळ आणि प्रभावीपणे राबवली जाईल, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.
>
> **– सुजाता बोराटे, सभापती, विधी समिती.**


PRIYADARSHANI SCHOOL & JR COLLEGE
MOSHI
43 YEARS OF
NURTURING VALUES,
EXCELLENCE AND
TOMORROW'S LEADERS.
ADMISSIONS OPEN FOR AY 2026-27
Grade Nursery to Grade V
WHY CHOOSE PRIYADARSHANI SCHOOL?
43 Years of Excellence in Education | Advanced Robotics & Computer Labs
Experienced and Dedicated Faculty | Multiple Sports Grounds for All-Round Development
Proven 100% Results in Grade X | A Perfect Blend of Tradition and Innovation
+91 9890613333 | +91 9373073077
pgosm05@gmail.com
www.priyadarshanischoolmoshi.in